पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, bos@sus.ac.in



अभ्यासमंडळे विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२०/ 40 दिनांक : - 2 JAN 2020

प्रति,
**मा. प्राचार्य/प्राचार्या,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
**सोलापूर.**

विषय: लोकशाही, सुशासन व निवडणूका या विषयासाठी अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार तासिका तत्वाप्रमाणे मानधन आदा करणेबाबत..

संदर्भ: दि. १३/१२/२०१९ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. २९ वर पारित झालेला ठराव.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भीय ठरावाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांच्या दि. ०२/०६/२०१७ रोजीच्या पत्रानुसार तसेच विद्यापीठाचे परिपत्रक क्र. SUS/ARD/Ph.D./२०१८/८९०९ दि. ११ ऑक्टोबर, २०१८ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास लोकशाही, निवडणूका व सुशासन या विषयाच्या विद्यार्थ्यांकरिता प्रति विद्यार्थी रु. २००/- प्रमाणे शुल्क आकारण्याबाबत आवगत करण्यात आले होते.

त्यानुसार सदरचा विषय अध्यापनासाठी लागू करण्यात आला आहे. परंतु संबंधित शिक्षकांकडून मानधनाची मागणी सतत होत होती. तसेच याबाबत विद्यापीठाच्या अधिसभेतही आधिसभा सदस्यांनी मानधनासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. वरील बाबी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३ मंत्रालय विस्तार भवन मुंबई दि. १४/११/२०१८ अन्वये प्रति तासाकरिता सद्य:स्थितीत रु. ५००/- प्रमाणे तद्नंतर शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या तासिका तत्वाप्रमाणे संबंधित अध्यापकास मानधन देण्यास दि. १३/१२/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. २९ वर झालेल्या ठरावनुसार सर्वानुमते मान्यता देण्यात आली आहे.

सबब, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. वि. भा. घुटे)
कुलसचिव